**Volume: 3 Issue: 1 Pages: 79-82**




# औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांचा अभ्यास

**[*1] सारिका हिरालाल माळी आणि डॉ. शेख तहेमिना नाज**

[*1] रिसर्च स्कॉलर, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर, महाराष्ट्र, भारत

[2] असोसिएट प्रोफेसर, शिक्षणशास्त्र विभाग, मराठवाडा कॉलेज ऑफ एज्यूकेशन, छ. संभाजीनगर, महाराष्ट्र, भारत

**Article Info.**
**E-ISSN: 2583-6528**
**Impact Factor (SJIF): 5.231**
**Peer Reviewed Journal**
**Available online:**
**www.alladvancejournal.com**

**Received:** 18/Dec/2023
**Accepted:** 23/Jan/2024

***Corresponding Author**
**सारिका हिरालाल माळी**
सारिका हिरालाल माळी, रिसर्च स्कॉलर, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर, महाराष्ट्र, भारत

**सारांश:**
कोणतीही गोष्ट शिकण्यासाठी त्याची सवय जडणे आवश्यक आहे. तसेच अभ्यासाची सवय लावण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. अभ्यासाची सवय जर चांगली असेल तर शैक्षणिक संपादणूक चांगली दिसून येते. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्व कळणे गरजेचे आहे. या अभ्यासात औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विदयार्थ्यांच्या अभ्यासवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांचा अभ्यास केला जाणार असून औरंगाबाद शहरातील मराठी माध्यमातील इयत्ता ९ वीचे ६० विद्यार्थी नमुना म्हणून निवडण्यात आले आहेत. माहीती संकलित करण्यासाठी सी. पी. माथूर यांची टेस्ट ऑफ स्टडी हैबिट्स ॲण्ड ॲटीट्यूड ही प्रामाणित चाचणी वापरण्यात आली आहे. माहीतीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनासाठी mean, SD, t- test या सांख्यिकीय तंत्रांचा वापर करण्यात आला आहे. निष्कर्षामध्ये असे दिसून आले की, औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासवयी खराब आहेत. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक संपादणूक कमी आहे. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले आणि मुलींच्या अभ्यासवयीत कोणताच फरक दिसून आला नाही. तसेच औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले आणि मुलींच्या शैक्षणिक संपादणूकीत फरक आढळून आला नाही.

**मुख्य शब्द:** अभ्यासवयी, शैक्षणिक संपादणूक

## प्रस्तावना

ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीमध्ये चांगल्या आणि वाईट दोन्ही सवयी असतात त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्येदेखील चांगल्या आणि वाईट अभ्यासवयी असतात. परंतू वाईट सवयीमध्ये योग्य बदल करून त्याचे रुपांतर चांगल्या सवयीत करता येते त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या अभ्यासवयी रुजवल्या तर त्यांच्या गुणवत्तेत वाढ होते व त्यांची शैक्षणिक संपादणूक चांगली होते. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगात प्रत्येकामध्ये जणू एक 'रॅट रेस' लागलेली आहे. प्रत्येकामध्ये दुसऱ्यापेक्षा पुढे जाण्याची स्पर्धा लागलेली आहे. प्रत्येकाला आपल्याला जास्तीत जास्त मार्क मिळावे यासाठी चढाओढ लागलेली आहे. या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विदयार्थ्यांना चांगल्या अभ्यासवयी लावणे गरजेचे आहे. त्यासाठी पालकांनी तसेच शिक्षकांनी विदयार्थ्यांना चांगल्या अभ्यासवयी लावाव्या जेणेकरून त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीत वाढ होईल. विदयार्थ्यांना चांगल्या अभ्यासवयी लावल्या तर ते तात्पुरता फक्त पास होण्यासाठीच अभ्यास करणार नाहीत तर योग्य अभ्यासवयी असतील तर नवीन ज्ञान मिळविण्याची उत्सुकता त्यांच्यात निर्माण होत राहील. त्यासाठी अवांतर वाचनाची सवय लावणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांची गुणवत्ता सुधारेल चांगल्या अभ्यासवयींमुळे मुले अधिक कार्यक्षम बनतील.

सवयी या एकाच दिवसात लागत नाहीत. कोणतीही नवीन सवय लावायला किंवा जुनी सवय बदलायला साधारणतः 21 ते 28 दिवस लागतात (ढापरे प्रसाद, 2022, p. 29). त्यासाठी विद्यार्थ्यांना चांगल्या अभ्यासवयी लावण्यासाठी शिक्षक तसेच पालकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. अभ्यासवयींमध्ये घरातील वातावरण, वाचन, नोट्स घेण्याच्या सवयी विषयांचे नियोजन, एकाग्रतेच्या सवयी, परीक्षेची तयारी, सामान्य सवयी आणि शालेय वातावरण यांचा समावेश होतो (नंद किशोर 2021, p. 97). शैक्षणिक संपादणूकीवर अभ्यासवयींचा प्रभाव पडतो. चांगल्या अभ्यासवयीचा विकास हा एखादया व्यक्तीच्या शैक्षणिक लक्ष्यापर्यंत पोहोचण्याचा महामार्ग आहे, मग ते

काहीही असो (Lawrence A. S. Arul, 2014). नियमित अभ्याससवयी विद्यार्थ्यांना कमी वेळात, कमी प्रयत्नात चांगली कामे करण्यास मदत करतात (नंद किशोर, 2021, p.98). समाजात नैतिकता, शिस्त व सुव्यवस्था टिकून राहण्यासाठी विदयार्थांना चांगल्या सवयी लावणे गरजेचे असते. कारण विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यामुळे देशासाठी, समाजासाठी चांगला नागरिक घडविणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांना चागल्या सवयी लावणे गरजेचे आहे. तसेच शालेय प्रगतीसाठी व शैक्षणिक संपादणूक चांगली होण्यासाठी चांगल्या व योग्य अभ्याससवयी असणे गरजेचे आहे. चौधरी अरविंद, (2013) यांच्या अभ्यासातील निष्कर्षात देखील अभ्याससवयी आणि उच्च माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या शैक्षणिक यशामध्ये लक्षणीय फरक सकारात्मक संबंध असल्याचे दिसून आले. अभ्याससवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात काय संबंध आहे? अभ्याससवयींचा शैक्षणिक संपादणूकीवर काय व कसा परिणाम होतो हे जाणून घेण्याची उत्सुकता संशोधिकेच्या मनात निर्माण झाल्याने औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांचा अभ्यास हा संशोधन विषय संशोधिकेने निवडला आहे.

**व्याप्ती व मर्यादा:** प्रस्तुत संशोधन हे औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.

प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी आणि शैक्षणिक संपादणूकीपुरतेच मर्यादित आहे.

## कार्यात्मक व्याख्या

1. **अभ्याससवयी:** ज्या सवयीने विद्यार्थी नियमित तसेच पद्धतशीरपणे अभ्यास करु शकतील अशा सवयी म्हणजे अभ्याससवयी.
2. **शैक्षणिक संपादणूक:** मागील इयत्तेतील व प्रवेशित इयत्तेतील आकारिक व साकारिक मूल्यमापनातील गुण/श्रेणी संपादन म्हणजे शैक्षणिक संपादणूक.

## उदिष्टे

1. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमधील अभ्याससवयींचा अभ्यास करणे.
2. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विदयार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीचा अभ्यास करणे.
3. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले व मुलींच्या अभ्याससवयींची तुलना करणे.
4. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादणूकीची तुलना करणे.

## परिकल्पना

1. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमधील अभ्याससवयी उच्च आहेत.
2. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक संपादणूक उच्च आहे.
3. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले व मुलींच्या अभ्याससवयीत कोणताच फरक नाही.
4. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादणूकीत कोणताच फरक नाही.

## संबंधित साहित्याचा आढावा

1. Nand Kishor, (2021), यांच्या Study habits and attitude in relation to parental involvement of National institute of open school (NIOS) students या अभ्यासातील निष्कर्षात सर्वसाधारण आणि राखीव, ग्रामीण आणि शहरी, महिला आणि पुरुष विदयार्थ्यांमधील अभ्याससवयी आणि वृत्तीमध्ये लक्षणीय फरक नसल्याचे आढळून आले. तसेच सामान्य आणि राखीव, ग्रामीण आणि शहरी महिला आणि पुरुष विद्यार्थ्यांमध्ये पालकांच्या सहभागात कोणताही फरक नसल्याचे आढळून आले.
2. Chaudhari N. Arvind, (2013), यांच्या Study habits of higher secondary school students in relation to their academic achievement या अभ्यासाच्या निष्कर्षात असे दिसून आले की उच्च माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या अभ्याससवयी आणि शैक्षणिक संपादणूक यामध्ये संपूर्ण आणि परिमाणानुसार लक्षणीय सकारात्मक संबंध आहे. तसेच अभ्याससवयींमध्ये उच्च आणि कमी शैक्षणिक यश मिळविलेल्या लक्षणीय फरक असल्याचे आढळून आले.
3. Kumar Sharath C. R., (2023) यांच्या A study - on - study habits & attitude among secondary school students या अभ्यासात असे दिसून आले की, SBSE आणि ICSE माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या अभ्याससवयीमध्ये कोणताही फरक नाही. दोन्ही शिक्षणव्यवस्थेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी खराब असल्याचे आढळून आले.
4. Singh Balvir & Mahipal, (2015) यांच्या Academic achievement of secondary school students in relation to their study habits या अभ्यासात सरकारी आणि खाजगी, पुरुष आणि महिला माध्यमिक शाळेतील विद्याथ्यांची शैक्षणिक संपादणूक आणि अभ्याससवयी याच्यात महत्वपूर्ण सबंध असल्याचे दिसून आले.
5. Ava Isabel A. Castillo & *et al* (2023), याच्या The Impact of study habits on the Academic performance of senior high school students Amidst Blended Learning या अभ्यासात आढळून आले की, माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या अभ्याससवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात एक महत्व आहे
6. Lawrence A. S. Arul, (2014) यांच्या Relationship between study habits & academic achievement of higher secondary school students या अभ्यासातील निष्कर्षात अभ्याससवयी आणि उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक यात कोणताही महत्वाचा फरक नाही असे दिसून आले.
7. खरात सुर्यकांत नामदेव आणि उपालाने मेघा महादेव, (2018), ऊँकार जपाचा अप्रगत विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादन यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास या अभ्यासात ऊँकार जपाच्या सरावामुळे अप्रगत विद्यार्थीपैकी चांगल्या अभ्याससवयींमध्ये 23.33% विदयार्थ्यांनी उत्तम श्रेणी, 33.33% विदयार्थ्यांना चांगली श्रेणी मिळाली. 30 विद्यार्थ्यांपैकी फक्त 17% विद्यार्थी अप्रगत राहीले. 63% शिक्षकांच्या मते, अयोग्य अभ्याससवयी व आशयज्ञानाच्या अभावामुळे विद्यार्थी अप्रगत राहतात. असे निष्कर्षात दिसून आले.
8. नन्नवरे पंकज कुमार, यांच्या शिरपूर शहरातील माध्यमिक व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व अभिवृत्तीचा अभ्यास या अभ्यासातील निष्कर्षात माध्यमिक व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी व विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीत व अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून आला नाही.
9. ढापरे प्रसाद, (2022), यांच्या "सवयी घडवतात बिघडवतात" या पुस्तकात सवयी कशा लागतात, वाईट सवयी कशा सोडवाव्या व चांगल्या सवयी स्वतःला कशा लावून घ्याव्यात तसेच सवयींची सुरुवात कशी होते, या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण तसेच टिप्सही सुचविल्या आहेत.

## संशोधन पध्दती

**जनसंख्या:** औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील शाळेत शिकणारे सर्व विद्यार्थी.
**न्यादर्श:** औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील शाळेत शिकणारे ६० मूले व मुली यादृच्छीक पद्धतीने निवडण्यात आले.
**साधने:** प्रस्तुत संशोधनासाठी C. P. Mathur यांची Test of Study Habits & Attitude ही प्रमाणित चाचणी वापरली आहे.
**संख्याशास्त्रीय परिमाणे:** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने मध्यमान, प्रमाणविचलन, व टी-टेस्ट या संख्याशास्त्रीय तंत्रांचा उपयोग केला आहे.

## विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

**सारणी १:** Norm Table for Study Habits

| S. No. | Range | Interpretation |
|---|---|---|
| 1 | 47 - 52 | Very Good |
| 2 | 41 - 46 | Good |
| 3 | 35 - 40 | Satisfactory |
| 4 | 29 - 34 | Poor |
| 5 | 23 - 28 | Very Poor |
| 6 | 17 - 22 | Extremely Poor |

**सारणी २:** Norm Table for Academic Achievement

| S. No. | Range | Interpretation |
|---|---|---|
| 1 | 86 - 92 | Excellent |
| 2 | 79 - 85 | Very Good |
| 3 | 72 - 78 | Good |
| 4 | 65 - 71 | Satisfactory |
| 5 | 58 - 64 | Poor |

**H1:** औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमधील अभ्यासवयी उच्च आहेत.

**सारणी ३:** Study Habits Mean

| S. No. | N | Mean | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | 60 | 28.5 | Poor |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, एकूण अभ्याससवयींचे मध्यमान २८.५ असून ते सारणी १ मधील २९ - ३४ या श्रेणीमध्ये येत असून ते खराब असल्याचे दिसून येते. यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांमधील अभ्याससवयी या ख़राब आहेत.
**H2:** औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक संपादणूक उच्च आहे.

**सारणी ४:** Academic Achievement Mean

| S. No. | N | Mean | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | 60 | 63.45 | Poor |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, शैक्षणिक संपादणूकीचे मध्यमान ६३.४५ असून ते सारणी २ मधील ५८-६४ या श्रेणीमध्ये येत असून अर्थनिर्वचनात कमी असल्याचे दिसून येते. यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक संपादणूक कमी आहे.
**H3:** औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले व मुलींच्या अभ्याससवयीत कोणताच फरक नाही.

**सारणी ५:** Study Habits of Boys & Girls

| S. No. | Type of Gender | N | Mean | SD | Df | "t" | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Boys | 30 | 42.8 | 7.5 | 58 | 0.55 | Accepted |
| 2 | Girls | 30 | 40.7 | 7.56 | | | |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, स्वाधीनता मात्रा (df) ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर सारणी 'टी' मूल्य २.०० असून प्राप्त 'टी' मुल्य ०.५५ आहे. त्यामुळे प्राप्त 'टी' मूल्य सारणी 'टी' मूल्यापेक्षा कमी आहे. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले व मुलींच्या अभ्याससवयीत कोणताच फरक नाही.
**H4:** औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादणूकीत कोणताच फरक नाही.

**सारणी ६:** Academic Achievement of Boys & Girls

| S. No. | Type of Gender | N | Mean | SD | Df | "t" | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Boys | 30 | 64.97 | 7.56 | 58 | -2.32 | Accepted |
| 2 | Girls | 30 | 69.02 | 5.88 | | | |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, स्वाधीनता मात्रा (df) साठी ०.०५ स्तरावर सारणी 'टी' मूल्य २.०० असून प्राप्त 'टी' मूल्य -२.३२ आहे. त्यामुळे प्राप्त 'टी' मूल्य हे सारणी 'टी' मूल्यापेक्षा कमी आहे. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल यावरून असे दिसून येते की, औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादणूकीत कोणताच फरक नाही.

## निष्कर्ष

1. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमधील अभ्याससवयी ख़राब आहेत.
2. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक संपादणूक कमी आहे.
3. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले व मुलींच्या अभ्याससवयीत कोणताच फरक नाही.
4. औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादणूकीत कोणताच फरक नाही.

## चर्चा

प्रस्तुत संशोधनाचा हेतू हा मराठी माध्यमतील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी कशा आहेत व विदयार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक अभ्यासणे व त्यात काही त्रुटी असल्यास उपाय शोधणे असा होता. त्यासाठी मुले व मुलींच्या अभ्याससवयींची तुलना तसेच मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादणूकीची तुलना करून निष्कर्ष काढण्यात आले. त्यावरून असे दिसून आले की, औरंगाबाद शहरातील इयत्ता ९ वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी खराब आहेत. त्यामुळे त्यांची शैक्षणिक संपादणूक देखील कमी असल्याचे आढळून आले. तसेच मुले व मुलींच्या अभ्याससवयीत कोणताच फरक नसल्याचे आढळून आले. मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादणूकीत कोणताच फरक दिसून आला नाही. असे म्हटले जाते की, अभ्याससवयी चांगल्या असतील तर शैक्षणिक संपादणूक चांगली असते. व अभ्याससवयी खराब असतील तर शैक्षणिक संपादणूक कमी होते.ते या संशोधनातून सिध्द झाले.
त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी सुधारण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी सुधारल्या तर शैक्षणिक संपादणूकही चांगली होईल. कदाचित शिक्षकांनी शिकवलेले

विद्यार्थ्यांना आकलन होत नसावे. त्यासाठी (१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी सुधारण्याकडे लक्ष दयावे, शिकविलेला अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना समजला किंवा नाही याची उजळणी करून घ्यावी, विद्यार्थी गृहपाठ वेळेवर करतात का याची चौकशी करावी, त्यांना प्रोत्साहित करावे, वाचन व लिखाणाचा सराव करून घ्यावा. (२) विद्यार्थ्यांनी शालेय गृहपाठ व इतर कामे पद्धतशीरपणे होण्यासाठी स्वतः प्रयत्न करावे, नियोजनपूर्वक कार्य करावे, जास्तीत जास्त गुण मिळविण्यासाठी अभ्यासात मेहनत घ्यावी, कठीण वाटणा-या विषयाबद्दल शिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे. (३) पालकांनी मुलांसाठी कोणत्या अभ्याससवयी चांगल्या आहेत हे जाणून घेऊन तशा सवयी त्यांना लावाव्या.

## समारोप

हा अभ्यास अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यांचा अभ्यास होता, यामध्ये दिसून आले की, अभ्याससवयी जर चांगल्या असतील तर शैक्षणिक संपादणूक चांगली होते व अभ्याससवयी जर चांगल्या नसतील तर शैक्षणिक संपादणूकही कमी होते. या संशोधनाच्या मदतीने विदयार्थ्यांना कोणत्या प्रकारच्या अभ्यासाची रणनीती त्यांच्यासाठी योग्य आहे हे समजेल. विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्व पटवून देणे तसेच शैक्षणिक संपादणूकीवर त्याचा कसा प्रभाव पडतो याबददल प्रबोधन करणे गरजेचे आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांची भविष्यात प्रगती होईल.

## संदर्भ


1. Nand Kishor. Study habits & attitude in relation to parental involvement of national institute of open school (NIOS) students, *An International Bi-Annual peer reviewed multidisciplinary research Journal (online),* 2001, 3.
2. Chaudhari N. Arvind, Study habits of higher secondory school students in relation to their academic achievement, *International Journal of research in humanities & social sciences.* 2013; 1(3).
3. Kumar Sharath CR. A study -on-study habits & attitude among secondary school students, International Journal for Research in Applied Science & Engineering Technology. 2023; 11(V).
4. Singh Balvir, Mahipal. Academic achievement of secondary school students in relation to their study habits, Bhartiyam International Journal of Education & Research a quarterly peer revieved *International Journal of Research & Education*. 2015; 4(III).
5. Ava Isabel A. Castillo,Charlotte Faith B. Allag, Aki Jeromi R. Bartolome, Gwen pennelope S. Pascual, Rusel Othello Villarta, Jhoselle Tus, The impact of study habits on the academic performance of senior high school students Amidst Blended Learning, *Psychology & Education : A multidisciplinary Journal.* 2023; (10).
6. Lawrence AS. Arul, Relationship between study habits & academic achievement of higher secondary school students, Indian Journal of Applied Research. 2014; 4(6).
7. खरात सूर्यकांत नामदेव आणि उपलाने मेघा महादेव, ॐकार जपाचा अप्रगत विदयार्थ्यांच्या अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादन यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास, Scholarly Research Journal for Interdisciplinary studies. 2018; 5(43).
8. नन्नवरे पंकज कुमार, शिरपूर शहरातील माध्यमिक व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व अभिवृत्तीचा अभ्यास, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies. 2017; 4(30).
9. ढापरे प्रसाद, सवयी घडवतात बिघडवतात, पुणे: मायमिरर पब्लिशिंग हाऊस प्रा. लि, 2012, 29.
10. कदम चा.प., शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नुतन प्रकाशन, 1999.
11. घोरमोडे, के, यु. आणि घोरमोडे लता, शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : विदया प्रकाशन, 2008.
12. भांडारकर, के. म., सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नित्य नूतन प्रकाशन, 2010.